शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१. यांचे कार्यालय
-8 SEP 2003
३३२५
आवक नोंदवही क्रमांक

(९३४-९५९)

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: व्हीएलएस १००३/(५५७/२००३)/प्राशि-३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :०७ ऑगस्ट, २००३.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक/ पुणे / कोल्हापूर/
अमरावती /नागपूर/ औरंगाबाद,

**विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ५८ शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गात ([illegible] तुकडीस) कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००३ पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तींवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु.२०/- एवढ्या रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असू हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदरहू हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.व्हीएलएस १०००/(५५७/२०००)(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

प्राथ
८/९/०२

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. तसेच सोबतच्या यादीतील संस्थेस तिच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्यांस यापूर्वी परवानगी देण्यांत आली असल्यांस प्रथम मान्यता देण्यापूर्वी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

( सु.ह.उमराणीकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे/पुणे/जालना/धुळे/सातारा/अहमदनगर/बीड/अकोला/रायगड/औरंगाबाद.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

## जिल्हा पुणे

**शासन पत्र क्रमांकः व्हीएलएस १००३/(५५७/०३)/प्राशि-३, दिनांक ७ ऑगस्ट, २००३ चे सहपत्र सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्त्वावर इंग्रजी माध्यमाच्या परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळांची यादी.**

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण मंडळ, पिं-चिं. म.न.पा. पुणे | तपोवन मंदिराजवळ, पिंपरी वाघेरे | इंग्रजी | १ ली 934 |
| २ | श्री स्वामी समर्थ ज्ञानपीठ, १४०/२ वारजे माळवाडी, पुणे | वारजे माळवाडी, पुणे | इंग्रजी | १ ली 935 |
| ३ | कै.नारायणरावचौंधे शिक्षण संस्था, पिंपळे नीलख, पुणे | विशालनगर, पिंपळे नीलख, पुणे | इंग्रजी | १ ली 936 |
| ४ | मातृ एज्यु.सोसा.सर्व्हे नं.१२२, श्री दत्तनगर, वाल्हेकर वाडी, चिंचवड, पुणे | वाल्हेकर वाडी, चिंचवड, पुणे | इंग्रजी | १ ली 937 |
| ५ | विश्वविवेक फाऊंडेशन, औंध रोड, खडकी, पुणे, ५०२, लेबॉनी टॉवर्स, | पिंपरी, पुणे | इंग्रजी | १ ली 938 |
| ६ | विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती, जि. पुणे | भिगवण, जि. पुणे | इंग्रजी | ली 939 |
| ७ | श्री ज्ञान बालविकास शिक्षण संस्था सर्व्हे नं. ४५१, क्रांतीनगर, पिंपळे नीलख, औंध कॅम्प, पुणे | औंध कॅम्प,जि.पुणे. | इंग्रजी | १ ली 940 |
| ८ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, २१/२, सावंत प्लाझा, बालाजीनगर धनकवडी, पुणे | धनकवडी, पुणे. | इंग्रजी | १ ली 941 |
| ९ | मेजर सर्व दमनसिंग फौंडेशन, आश्रय, सुविद्या पार्क-२, सीएमई रोड, भोसरी, पुणे | भोसरी (गव्हाणे वस्ती) जि.पुणे | इंग्रजी | १ ली 942 |

एकूण ९ (नऊ) प्राथमिक शाळा

[signature]

विद्या प्रतिष्ठान,बारामती, जि.पुणे संचालित विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मिडीयम स्कूल, भिगवण जि.पुणे या शाळेचे, चिंचोली, जि. पुणे येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३२३/प्र.क्र.४९७/२३ /एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२३

वाचा :

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : माशास्थ ३३२१/प्र.क्र.४०१/एसएम-१ दिनांक २८ जुलै, २०२१.

संदर्भ :

विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे जा.क्र.शिउसं/प्राथ/२०४/स्थलांतर /पुवि/२०२-२०२४/९७३९, दि.२६.०९.२०२३ रोजीचे पत्र.

प्रस्तावना :-

विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती, जि.पुणे संचालित विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मिडीयम स्कूल, बिल्ट भिगवण ता.इंदापूर, जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या स्वयंअर्थसहाय्यित उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शाळेचे, चिंचोली, ता.दौंड जि.पुणे येथे स्थलांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त शाळेचे भाड्याच्या इमारतीमधुन संस्थेच्या स्वमालकीच्या जागेत स्थलांतर प्रस्तावित केले आहे. त्यामुळे सदर शाळेचे उपरोक्त ठिकाणी स्थलांतर करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.:-

(१) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही. तसेच इच्छुक विद्यार्थ्यांना स्थलांतराच्या ठिकाणी सामावून घेणे आवश्यक राहील.

(२) सदर शाळा इंग्रजी माध्यमाची स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील असल्याने शाळेत कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(३) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(४) शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये वदल होणार नाहीत.

(५) सदर स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सदर शाळेच्या स्थलांतराबाबत पुढील कार्यवाही १५ दिवसांत करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१०१६१८०९११०२२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने.

PRAVIN RAJARAM MUNDHE

Digitally signed by PRAVIN RAJARAM MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865ed a3495969f77d97c89a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DC78036626EC580D66C0AC502D43AF5F670B5B A13F51213AD071ACD53714A284, cn=PRAVIN RAJARAM MUNDHE
Date: 2023.10.16 18:16:02 +05'30'

(प्रविण मुंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे
४. अध्यक्ष/ सचिव, विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती, जि.पुणे
५. निवडनस्ती (एसएम-१).

सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या खाजगी माध्यमिक शाळा कायम विनअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगीबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुद्धीपत्र क्रमांकः एसएफएस-१०२३/प्र.क्र.७६०/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: १२ ऑक्टोबर, २०२३

वाचा :-

१. शासन पत्र, शालेय शिक्षण विभाग, क्र. व्हीएलएस-१००३/(५५७/२००३)/प्राशि, दि. ०७/०८/२००३.

शासन शुद्धीपत्रक :-

सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती, जि. पुणे संचलित इंग्लिश मिडीयम स्कूल, बिल्ट भिगवण, ता. इंदापूर, जि. पुणे या शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यास संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील शाळेचे नाव **"इंग्लिश मिडीयम स्कूल"** ऐवजी **"अनंतराव पवार इंग्लिश मिडीयम स्कूल"** असे वाचावे.

२. संदर्भाधीन दि. ०७/०८/२००३ च्या शासन पत्रातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवडनस्ती (७६०/२३/एसएम-२).